**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १</u>** **<u>सं.फौ.ख.क्र.१८०–२०२१</u>**

**नकीब विरूध्द भुषण**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की** **निशाणी – ३०**

**पुढील सरतपास फिर्यादी तर्फे वकील श्री. सउद अफसर यांच्या कडून –**

१२. मला आता माझे निशाणी ३० कडील सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखविले. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर मी सहया केल्या आहे.

१३. मला आता निशाणी ३२/१ कडील मुळ धनादेश दाखविला. सदरचा चेक आरोपीने मला दिला होता तो रक्कम रू.४ लाखाचा आहे. त्यावर आरोपीची सही आहे. तो चेक दि.०१.१२.२०२१ रोजीचा असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी ३४</u>** देण्यात येते.

१४. मला आता निशाणी ३२/२ कडील चेक रिटर्न मेमो दाखविला. तो तोच आहे. त्यावर बँकेचा शिक्का व सही आहे. तो दि. ०८.०१.२०२१ रोजी परत आल्याचा मेमो आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी ३५</u>** देण्यात येते.

१५. मला आता निशाणी ३२/३ कडील नोटीस दाखविली. सदरची नोटीस अ‍ॅड. सउद अफसर यांच्यामार्फत मी आरोपीला पाठविलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझ्या वकीलांची सही आहे ती मी ओळखतो. त्यास **<u>निशाणी ३६</u>** देण्यात येते.

१६. मला आता निशाणी ३२/४ कडील नोटीस पाठविण्यासाठी पोस्टात पैसे भरल्याची पावती दाखविली. ती दि.१८.०१.२०२१ ची आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी ३७</u>** देण्यात येते.

१७. मला आता निशाणी ३२/५ कडील नोटीस पोच झाल्याची पोस्टाची पावती दाखविली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी ३८</u>** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. गजवे यांनी मुदतीचा अर्ज दाखल केल्याने पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

वा.दा.ब.अ.क.के.

समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT

Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.07.11 15:43:44 +0530

कामठी (मोहन रा. कामत)

दिनांक १०/०७/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

न्या.क्र. १, कामठी